**<u>ठळक बातम्या</u>**

- कीडरोग मुक्त रोपं निर्मितीसाठीच्या 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत देशातील ९ पैकी ३ केंद्र महाराष्ट्रात उभारणार असल्याची केंद्रीय कृषिमंत्र्यांची घोषणा

- राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी गेलेली बहुपक्षीय शिष्टमंडळं मायदेशी परतायला सुरुवात, या उपक्रमामुळे सरकारची उद्दिष्टं साध्य झाल्याची परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची प्रतिक्रिया

- आसाममधे पूरस्थिती गंभीर, राज्यात २२ जिल्ह्यांमधल्या ५ लाखांपेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका, पुरामुळे अकरा जणांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अंतिम सामना सुरू

**<><><><><>**

कीडरोग मुक्त रोपं निर्मितीसाठीच्या 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत देशातील ९ पैकी ३ केंद्र महाराष्ट्रात उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली. विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत पुण्यात आयोजित कृषी हॅकेथॉनच्या समारोप समारंभात ते आज बोलत होते. द्राक्षाचं केंद्र पुणे इथं, संत्र्यासाठी नागपूर आणि डाळींबासाठी सोलापूर इथं केंद्र सुरू करण्यात येणार असून या केंद्रांच्या आधारे राज्याचं फलोत्पादन क्षेत्र जगात आघाडी घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेती क्षेत्रासमोर अनेक समस्या असताना शेतकऱ्याला साहाय्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा एकमात्र उपाय आहे. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणं गरजेचं असून त्यासाठी कृषी विभागानं पुढाकार घेऊन कृषी महाविद्यालयांमध्ये इन्क्युबेशन केंद्रं तयार करावीत, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**---बाईट---मुख्यमंत्री.**

शेतकऱ्यांच्या फायदेशीर शेतीला दिशा देण्याचं कार्य कृषी हॅकॅथॉननं केलं आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.  यापुढील काळात विविध ठिकाणी असे उपक्रम राबवण्यात येतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला. आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषांगिक खर्चालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली  आहे. केंद्रीय स्तरावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे असल्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणं आवश्यक आहे. त्यामुळे ५१ व्या जनजाती सल्लागार परिषदेत राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगात एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्य असतील. आयोगाकरिता नव्याने २६ पदं निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठी तसंच अनुषंगिक खर्चासाठी ४ कोटी २० लाख रुपयांच्या तरतूदीला बैठकीत मान्यता देण्यात आली.

या आयोगाची स्थापना केली असली तरी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचा आदिवासी विकास विभाग सुद्धा कार्यरत राहणार आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ जून २०२५ - मंगळवार

<><><><>

महाराष्ट्रात अवकाळी पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत सरकार विचार करेल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्याबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी हे आश्वासन दिलं. घराची दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी मदतीकरीता तात्काळ निधी देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार सुमारे ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी या बैठकीत दिली.

<><><><>

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण लाभार्थी मेळावा आज केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यामध्ये झाला. या समारंभात महाआवास राज्यस्तरीय पुरस्कारांचं वितरण झालं, तसंच काही लाभार्थ्यांना त्यांच्या घरांच्या प्रतीकात्मक चाव्या प्रदान करण्यात आल्या. महाराष्ट्रातल्या ३० लाख बेघर जनतेला प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे मिळवून देणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. या घरांसाठी ८० हजार कोटी रुपये खर्चाची तरतूद केंद्र सरकारने केली असून राज्य सरकारतर्फे प्रत्येक लाभार्थ्याला ५० हजार रुपयांचं अनुदान देणार असल्याचं ते पुढे म्हणाले.

<><><><>

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना एक कोटी रुपयांचं अपघाती विमा कवच लागू करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केली. सह्याद्री अतिथीगृहात एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य

योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर या महिन्यापासून ४६ टक्क्यांऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय या बैठकीत झाला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊ ऐवजी १२ महिन्यांसाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी जगातल्या विविध देशांना भेट देण्यासाठी रवाना झालेली बहुपक्षीय शिष्टमंडळं मायदेशी परतत आहेत. अल्जेरिया, सौदी अरेबिया, कुवेत आणि बहरीन या देशांना भेट देऊन परतलेल्या भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज नवी दिल्ली इथं परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांची भेट घेतली, आणि आपल्या प्रतिक्रिया आणि सूचना सादर केल्या. या उपक्रमातून सरकारची सर्व उद्दिष्टं साध्य झाल्याचं जयशंकर म्हणाले आणि त्यांनी या शिष्टमंडळाचं अभिनंदन केलं, अशी माहिती शिष्टमंडळाचे सदस्य, तसंच राजनैतिक अधिकारी हर्षवर्धन श्रृंगला यांनी दिली. द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ रशिया, लाटविया, स्लोव्हेनिया, ग्रीस आणि स्पेनचा दौरा करून आज परत येईल.

**<><><><><>**

पाकिस्ताननं दहशतवादाचा पुरस्कार करणं थांबवायला हवं, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. ते आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ‘भविष्यातली युद्ध आणि युद्धतंत्र’ या विषयावर व्याख्यान देत होते. पाकिस्तानचं छुपं युद्ध यापुढे सहन केलं जाणार नाही, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. पहलगाव हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी हाती घेण्यात आलेली ऑपरेशन

सिंदूर ही कारवाई, दहशतवादाविरोधातल्या भारताच्या विकसित होत असलेल्या धोरणाची साक्ष देत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

आसाममधल्या पूरस्थितीनं आणखी गंभीर रूप घेतलं असून, राज्याच्या ५ लाखापेक्षा जास्त नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. पुरामुळे आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातली १ हजार २५० पेक्षा जास्त गावं पुरामुळे बाधित झाली असून, १२ हजार ६०० हेक्टरपेक्षा जास्त शेतजमिनीचं नुकसान झालं आहे.

ब्रह्मपुत्रा, बराक आणि या नद्यांच्या सर्व उपनद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याचं राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. पूरग्रस्त नागरिकांसाठी राज्य सरकारनं १६५ मदत छावण्या आणि १५७ मदत केंद्र उघडली आहेत. पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री पूरग्रस्त भागाला भेट देऊन मदतकार्याला आढावा घेत आहेत. रेल्वेमार्गावर पाणी साठल्यामुळे आसाममध्ये येणाऱ्या काही रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

सिक्कीममध्ये लाचेन इथं अनेक ठिकाणी भूस्खलन झालं असून, दीडशेपेक्षा जास्त पर्यटक अडकून पडले आहेत. उत्तर सिक्कीममध्ये चाटेन इथं अडकलेल्या ३४ नागरिकांच्या पहिल्या तुकडीची भारतीय हवाई दलानं आज सुटका केली. हेलिकॉप्टर उतरण्यासाठी योग्य पृष्ठभाग तयार करण्यात लष्कराच्या तुकडीला यश

आलं असून उरलेल्या पर्यटकांची उद्या सुटका होईल. यात महाराष्ट्रातल्या काही पर्यटकांचा समावेश असून त्यांच्या सुटकेसाठी राज्य सरकारने सिक्कीममधल्या महाराष्ट्र सदन निवासी आयुक्तांमार्फत स्थानिक प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधला होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. राज्यपाल ओम प्रकाश माथूर यांनी सिंगथाम इथे भेट देऊन मदतकार्याचा  आढावा घेतला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना  सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम  क्षेत्ररक्षण  करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या  ८ व्या षटकात २  बाद ६९ धावा झाल्या होत्या. २००८ पासून सुरू झालेल्या आयपीएल स्पर्धेत आजतागायत या दोन्ही संघांकडे विजेतेपद आलेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा आहे.

**<><><><><>**

भारताच्या दौऱ्यावर आलेल्या पॅराग्वेचे अध्यक्ष सँटियागो पेना यांचं आपल्या शिष्टमंडळासह आज मुबंईत आगमन झालं. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत केलं. यावेळी पॅराग्वेतील भारतीय राजदूत पियुष सिंह, प्रधान सचिव अंशु सिन्हा यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

**//<><><><><>//**